तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**www.prabhutarun.com**

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर

मयुरा नायक

संजना कोठारे

वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, बुधवार, ता. १६ माहे डिसेंबर, सन २००९ (अंक ९६६


*संपादकीय*

## बोलू कौतुके

-सुहासिनी कीर्तिकर

रविवार, दिनांक ६ डिसेंबर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाणदिन. 'शिक्षणाची शेती पावसावर अवलंबून नसते. तेव्हा ती कसा. त्याचे उत्पन्न कधीही कमी होणार नाही.' असं आपल्याच माणसांच्या भाषेत सांगत त्यांनी 'आपल्या माणसां'ना 'शिका' हा मंत्र दिला. या मंत्राचे पालन करीत 'मंतरलेली माणसं' या दिवशी चैत्य भूमीवर हेलावतात, सागर बनून उसळतात. 'महामानवा'ला वंदन करतात. तो एक सोहळाच असतो.

या सोहळ्याचे साहचर्य घेऊन 'आपली माणसं' ही अशीच हेलावत, उसळत, महासागर बनत एक सोहळा याच दिवशी अनुभवती झाली. त्यावेळी सद्‌भाग्याची आंतरिक जाणीव पुन्हा एकदा उसळी मारू पहात होती. खरंच आपलं भाग्य किती थोर! 'शिका' असा मंत्र द्यायचीच आपल्याला गरज नाही. रक्तातून, घराण्यातून, पिढ्यानुपिढ्या असलेल्या आपल्या परंपरेतून हा मंत्र वहात वहात आलाय् आपल्या ज्ञातीत. भलीभली माणसं भल्याभल्या पदव्या घेऊन आजवर केव्हढं कर्तृत्व गाजवीत आली आहेत आपल्या ज्ञातीत. त्यांचा झेंडा आजही फडकत ठेवणारी आजची पिढी त्यामुळं त्यांच्या पावलावर पावलं टाकीत आणखी पुढची पावलं यशस्वीपणं आणि कर्तबगारीनं टाकताहेत. त्यांचं कौतुक आणि आनंद सगळ्यांनाच आहे. असणारच हो! त्याला दृश्य रूप मिळालं या दिवशीच्या कौतुक-सोहळ्यात. 'पाठारे प्रभु चॅरिटीज'चा हा सोहळा. ही संस्था त्याला 'विद्या-भूषणांचा सत्कार सोहळा' म्हणत असली तरी तो आमूलाग्र आणि अखंड असा सत्कारासह आनंद-सोहळाच असतो. संस्थेच्या दिमाखाला आणि तिच्याकडून असलेल्या अपेक्षांना साजेसा. 'बहुत जनांसी आधारू' असलेल्या चॅरिटीजच्या या सोहळ्याची तऱ्हाच न्यारी! संयोजन, मांडणी, आखणी, सादरीकरण, वेळेची शिस्त सगळ्याच बाबतीत या संस्थेचं कौतुक करावं तेव्हढं थोडंच. देखणी पुस्तिका, तुतारीच्या निनादात येणारी अभिजन मंडळी, स्टेज भरून आणि मन भरून उरणारी सत्कारविजेती, उच्च-विद्याविभूषित आणि सुसंस्कारीत विद्यार्थी मंडळी; (मंचावरील सजावटीत भर टाकणारी ही मुलं खरंच 'विद्यार्थी' होती. कारण 'मी पुन्हा परत येईन' अशी ग्वाही त्यातील काहींनी दिली.) त्यांना आशीर्वाद देणारी मंचावरील आणि समोरील खरी-खुरी 'आप्त' मंडळी, सुरेल स्वरांची (स्वरांची जादू होती सौ. रोनिका विजयकर कु. प्रेरणा मानकर, भट यांची.), आणि ओघवत्या भाषणांची रेलचेल-असा सगळा 'माहौल' असल्यावर हा शानदार सोहळा 'जानदार' होणारच. यात खरीखुरी जान आणली ती सत्कारमूर्तींच्या हृद्य मनोगतांनी. पुस्तकी शिक्षण पुरेसं नाही. ते अभिव्यक्त झालं पाहिजे. त्यासाठी वाणी हे प्रभावी माध्यम. त्यावर झालेले उत्तम संस्कार दोन दोन मिनिटांच्या भाषणात विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. आपल्या मुलांनी आपल्या माणसांसमोर असं व्यक्त होणं फार जिव्हाळ्याचं, आनंदाला भरतं येणारं असतं. पुष्कळदा असं

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Clean bowled!!!

- संजना कोठारे

Cricket was the flavour of the month with the Indians rejoicing their victory this November 2009. To match the spirit of the triumphing match, the weddings this season were also rejoiced with much gusto. One such wedding which stood apart from the rest was that of the "Dhurandhar v/s Vijayakars". Now one might wonder if this was a war of some kind with the mention of 'versus'. Well as a matter of fact yes it was. The uniqueness of this grand wedding was the way it was celebrated. The Pathare Prabhu weddings have been evolving since more than decade now with the adoption of 'sangeet nite' which is celebrated and enjoyed by one and all. Once a wedding is announced in the family the youngsters start to gear up for the sangeet with even the elders appreciating and actively taking part in the organizing of the event.

However the Sangeet nite was celebrated differently during the 'Dhurandhar v/s Vijayakar' pre-wedding celebrations. To describe it I would use the most popular cliché used by almost all the Film Directors who are trying to promote their fims, '***Zara hat ke',*** however this pre-wedding celebration being the brian-wave of the groom Nishad Dhurandhar s/o Mr. Bansidhar and Dr. Surekha Dhurandhar (trustee and treasurer of Prabhu Tarun respectively) gave the wedding a much deserved exclusivity.

Nishad is an active Yuva Manch committee member. Nishad thought of having a cricket match between the Dhurandhars and the Vijayakar family. Nishad himself being an ace cricketer having a fetish for cricket got the perfect family as in-laws with Mr. Pradip Vijayakar as his father-in-law completely supporting his passion for the game and a fun match between the two families.

'Nani Niwas', the abode of the Dhurandhars at Vile Parle welcomed the performers with open arms and the dance rehearsals took off in great swing with our in house choreographer Jui and Shankar. It was a pleasure rehearsing with the seniors taking equal pleasure sitting as audience and applauding the performers. Dr. Vinod and Anuradha kaki alongwith Bansi kaka's sisters, Mrs. Suruchi Pradhan and Mrs. Bageshri Parekh alongwith their families enlivened the beautiful 'wada' with their presence. Not to forget the wonderful meals those were spread across for every rehearsal. Well those were the preparations on the Dhurandhars side for the sangeet however the Vijayakars were not too far.

Known for celebrating every function with great fervor with all the family members sharing the same amount of passion for enjoyment, the Vijayakars who are not new to the Sangeet note, started off their rehearsals under the able guidance and impeccable choreography of our dancing queen Mrs. Mayura Nayak who has been instrumental in choreographing not only for the Social Samaj dances but also for several 'sangeets' in our community.

Well now the icing on the

(Cont.. on page 2, Col.3)

(पान २, कॉलम १ वर)

होतं की व्यक्त व्हावंसं वाटूनही ते शक्य होत नाही. ‘चॅरिटीज’नं ही व्यक्त होण्याची संधी मुलांना दिली; याबद्दलही मला वाटतं;- ही मुलं कृतज्ञच असतील.

या मुलांबद्दल वाटणारं आपलेपण प्रमुख पाहुण्यांच्या, श्री. प्रभंजन धुरंधरांच्या भाषणातूनही जाणवलं. नवव्या मजल्यावरील त्यांचं सजलेलं घर देखणं असेलच; पण त्यांच्या भाषणात उतरलेली त्यांची भावना आणि मुलांना दिलेलं मार्गदर्शन नक्कीच आलेल्या मंडळीच्या मनात ‘घर’ करून वस्तीला आलं असणार. विशेष सत्कारमूर्ती श्री. महेश कोठारेंनी ‘चॅरिटीज’बद्दल ज्या आत्मीय आठवणी सांगीतल्या; त्याही अशाच ‘घरेलू’ आणि औचित्यपूर्ण होत्या. निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता अशी कोणतीही अर्जित झूल अंगावर न मिरवता केवळ पाठारे प्रभू असण्याची जन्मसिद्ध ‘शाल’ पांघरून त्यांनी सत्कार स्वीकारला; हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळं त्यांच्या अर्जित कमाईची श्रीमंती आणखीनच झळाळून उठली. ‘विद्या विनयेन शोभते’ हे तर विद्यार्थी, वक्ते, आयोजक-सर्वांच्याच बाबतीत वागण्याबोलण्यातून प्रत्ययाला येत होतं. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. अजित विजयकर काय; किंवा विश्वस्त श्री. वीरपाल राणे काय;- त्यांच्या भाषणात भाषणबाजी नव्हती. होता तो उत्स्फूर्त ओघ, आशयसंपन्न विचार आणि चॅरिटीज या संस्थेचं प्रतिनिधीत्व करणारा भाव. त्यामुळं त्यांची भाषणं पाहुण्यांची ओळख करून देता देता त्यांच्या स्वत:च्या वक्तृत्वाची ओळख करून देणारी झाली. सतरा लाखापर्यंतच्या देणग्या या संस्थेला याप्रसंगी मिळाल्या ही या संस्थेच्या आणि संस्थेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवरील विश्वासाची पावतीच होती ती यामुळेच. (देणगीवाचन’ श्री. सुनील कोठारे यांनी केले. आभार जरा जास्तच उमाळ्याने मानले ते श्री. संदीप वेलकर यांनी.) याच विश्वासाने नलिनी तळपदेंनी काव्यलेखनात जादू केली होती.

सर्वच कौतुकसोहळा आनंददायी, अप्रतिम होता. शंकाच नाही. मात्र काही गालबोट होते लागलेले. भविष्यात सुधारणा व्हावी या सद्‌हेतूनेच हे उल्लेखावे लागतेय्. १) तुतारीच्या निनादात विद्यार्थ्यांची जी भूषणावह मिरवणूक निघाली ती दरवर्षी निघतेच. मात्र यावर्षी आयोजनात थोडी फसगत झाली आणि ही मिरवणूक दोन भागात विभागली जाऊन त्यातले रम्यत्व, भव्यत्व हरवून बसली. सुरुवातच अशी झाल्यानं मनाचा विरस झाला. २) सूत्रसंचालिकांचे मराठी निवेदन अधिक सरावाचं व्हायला हवं होतं. ३) विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्यानं दोन पाखात चार चार विद्यार्थी बाजुला बसवले जातात- हे दृश्य मनोरम वाटत नाही. त्या विद्यार्थ्यांच्या यशावरील प्रकाशझोत अंधारात गेल्यासारखा होतो. मान्य आहे की जागाच अपुरी पडते मंचावरची. पण मंचावर विद्यार्थ्यांसाठी पुढे आणि पाठी दोन (समोरील रांगेपेक्षा मागची रांग थोडी उंच अशा) रांगा करून या बाजुच्या पाखात गायनवादनाची सोय केल्यास सर्व विद्यार्थ्यांना सारखाच प्रकाशझोत लाभेल. अर्थात् ही सूचना आहे. संस्थेसाठी ती कितपत व्यवहार्य आहे; ते संस्थेनं ठरवावं.४) सांस्कृतिक संकेतानं मनाला अशी सवय झालीय की ‘पसायदान’ म्हणजे मैफिलीची भैरवीच. त्यानंतर स्वातंत्र्यगीत, राष्ट्रगीत हे या सवयीला सांस्कृतिक धक्के (Cultural Shock) देणारं वाटलं. गायकवादक उत्कृष्ट होतेच. तरीही सहासात गाण्यांची सुरेल मेजवानी अजीर्ण होतेय् की काय; अशी वाटली. ५) आणखी एक त्रुटी संस्थेची नव्हे; तर आम्हा कौतुक करणाऱ्यांच्या वृत्तीची जाणवली. बक्षिसविजेत्यांनी बक्षिस घेताना आमच्याकडून टाळ्या कमी पडत होत्या. विद्यार्थी मनोगताला जशा कडाडून पडत होत्या तशा बक्षिस घेतानाही पडायला हव्या होत्या. पण टाळ्यांची टाळाटाळ होत होती. असो.

-तरीही कोणतीही टाळाटाळ न करता संस्थेच्या कार्याचं, आयोजनाचं, विद्यार्थ्यांचं मनभरून कौतुक करायलाच हवं हे शंभर टक्के खरंच. सर्वांनाच भविष्यवेधी शुभेच्छा. ❑

---

## खूषखबर

प्रभुतरूणाची वेबसाईट नव्याने सुरू झाली आहे. **रु. १०००/- ऐवजी सवलतीची किंमत रु. ५००/- केली आहे.**

आजीव सदस्य व्हा आणि ‘ऑन लाइन’ प्रभुतरुण नियमित वाचा. पोष्टाचा होणारा विलंब टाळा. वर्गणी कृपया

डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर
नानी निवास,
दिक्षीत रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई-५७ या पत्त्यावर पाठवावी.

वेबसाईट: www.prabhutarun.com

---

## प्रतिक्रिया

संपादिका,
प्रभुतरुण

कसे सुरू करू; कळत नाही. उशिरा का होईना पण वैजयंती कीर्तिकरचे अभिनंदन करणे फार फार गरजेचे आहे. सप्टेंबरच्या विस्तारीत संपादकीय `Gift of vision' ने एक गोष्ट नक्कीच दृष्टीस पडली ती ही की ‘मां के बराबर बेटी भी.’ योग्य शब्द व वाक्यांनी वाचकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात ती यशस्वी झाली. एरव्ही शांत दिसणारी ही मुलगी हाती लेखणी येताच कशी बदललेली नजरेस पडते. का नसावी? येव्हढी वर्षं सुहासिनी कीर्तिकरांच्या सहवासातून काहीतरी हाशील होणारच. हे मांडण्यास उशीर झाला त्याबद्दल क्षमस्व. पण वैजयंती, तुझे करू तितके अभिनंदन कमीच पडणार.

तरुणाचा दिवाळी अंक म्हणजे उत्कृष्ट पॅकिंगमध्ये पाठविलेला सुंदरसा मधूर केकच. परभांकडे रोठ हा प्रकार प्रचलित आहे. तो गोड असतो पण आकर्षित करण्यासाठी सजावट नसते. दिवाळी अंकाचा हा केक तयार करताना वडिलधाऱ्यांना मान देऊन ह्या केकचा बेस तयार केला. त्यात First time, Ideal Date व काळाला अनुरूप व्यंगचित्रासारख्या मनुका, बेदाणे व सुका मेवा भरून भाजून तयार केला. त्यावर ‘कांदे पोहे’ सारख्या गोड आठवणींचे चॉकलेटी वेष्टन घातले. हे कांदेपोहे १९७१ सालचे असो वा २००७चे, रंग एकरूपी चॉकलेटीच होता. तसाच गोडवाही. Dream Houseच्या सुंदर छायाचित्रांनी सजवलेल्या ह्या केकवरचे King म्हणजे Kiddy Treat. जसे चिमखडे बोल अक्षरांतून प्रकट झाले. दिवाळीच्या पारंपारिक सुकडीत ह्या केकचे सर्व परभांनी स्वागत केले असणारच. हा केक आमच्या घरी तरी सर्वांना अतिशय भावला.

समस्त तरुणकारांचे पुन्हा अभिनंदन करतो.

आपला स्नेही
**-उदय बा. जयकर**

---

(Cont..from page 1, Col.4)

cake was the event prior to the Sangeet. Venue being Khar Gymkhana and the bride-to-be being the daughter of Mr. Pradip Vijayakar, haven’t you guessed the event??? Well, following our Parbhi ritual of ‘fhulabharna’ the guests moved base on the grounds of the Khar Gymkhana to witness the Cricket match between the Dhurandhars and the Vijayakars. Both the teams were dressed in their team t-shirts specially designed by Nishad Dhurandhar for the match was sporting the names of their teams i.e. the Dhuarandhar XI and the Vijayakar XI and ‘The Wedding Challenge’ written on the back. Since Wills or Adidas were not the sponsors for the event, the T’s did not sport their logos however the book written by Mr. Pradip Vijayakar’s named ‘Shapooji Sokajee’ found its place on the team’s T.shirts.

Both the team members looked grand sporting their team shirts and one could actually get the feel of the actual match being started with the team members being encouraged by none other than Mr. Sunil Gavaskar and Mr. Dilip Vengsarkar who had graced the occasion along with Mr. Karsan Ghavri. The teams took off with our ‘Parbhi Sachin Tendulkar’ or should I say Sunil Gavaskar himself was playing in the form of our Gunjarav Nayak who smashed the boundary at every ball and also winning the Best batsman award which was awarded by Nishad’s grandfather Mr. Deshpande. Gunjarav was a treat to watch. As is rightfully said, ***“Great things come in small packages”***. Gunjarav belonged to the Vijayakars team however was incidentally being cheered even by the Dhurandhar’s cheer girls. The cherry in the Vijayakars team were the youngest team members like Krish Mankar and Soumil Kothare aged 9 and 7 resp. who played remarkably well with Krish also winning the Best Bowler award. Mehul Kothare and Rohit Shah joined Gunjarav in scoring a neat 80 runs from 12 overs. The Dhuradhars matched to the Vijayakars vigor with Parag Dhurandhar, Nishad and Ranjit Kalia taking the Dhurandhars to victory. Ranjit Kalia was awarded the Man of the Match Award from the winning team.

The Vijayakar’s cheer leaders who were dressed for the sangeet nite which was to be followed swayed their duppattas whilst crooning in the glory of Vijayakars. The evening was alive and full of joy with the stands being packed with audiences cheering both the teams equally. Following the award ceremony the guests moved to for the Sangeet nite to witness a spectacular evening filled with songs and dances with the bride-to-be Devashree singing a lovely song ***‘Tere mere sapne ab ek rang hai’*** dedicated specially to her would-be-groom.

The wedding also witnessed the beautiful bride and the handsome groom dressed in typical Pathare Prabhu attire along with the groom’s mother who looked ravishing in a beautiful Kasbi designed by our very own Dipti Dhairyawan Vijayakar. Dr. Surekha has no traces of being a non Pathare Prabhu and could put any pure Pathare Parbhu to shame with the kind of dedication, involvement and affection she has towards the community. Dr. Surekha has not only won the hearts of the Dhurandhar household but also of our Pathare Parbhu clan making us proud to have her associated with our community. Must thank Mr. Bansi Dhurandhar for the same. The wedding reception arranged by the Dhurandhars sported an inimitable menu with amazing jwari and bajra bhakirs, thalipeth, pithale, and bharit with mirchicha thecha to complete a typical Maharashtrian menu along with the regular mouth watering spread. The entire wedding function was immaculately arranged by the Dhurandhars and the Vijayakars which actually **‘*clean bowled*’** the guests.

सुमने- **बालविभाग**

# नवं घर

**-डॉ. सुमन नवलकर**

''काय अंकूर? तुमचं घर नवीन करतायत ना? मजा आहे बुवा!''

निनादच्या या बोलण्यावर अंकूरने हसून मान डोलावली खरी, पण घर नवीन करायला घेतल्यापासून घरातली मजा कमीच होत चालली होती एकेक करत.

पहिल्याच दिवशी तो शाळेतून आला तेव्हा भिंतीजवळची कॉट-कपाट सगळं हलवून मधोमध आणलं होतं. भिंती घासायचं काम चालू होतं. कॉटच्या पाठची भिंत अंकूरच्या खास आवडीची. रोज अंकूर कॉटवर कोपऱ्यात भिंतीला टेकून बसायचा. त्याची पाठ आणि डोकं टेकायचं तिथे भिंतीवर एक मोठा आणि एक गोल छोटा असे ठसे उमटले होते. बसताना अंकूर नेहमी त्या ठशांवर पाठ आणि डोकं टेकूनच बसणार. दुसरं कोणी त्या जागेवर बसलं तर राग यायचा त्याला. त्याची एकट्याची जागा होती ती. आता भिंती घासल्यावर ठसे गुल झाले होते. मग भिंतींना रंग लागला आणि ठशांचा मागमूस राहिला नाही. कपाट-कॉट आपापल्या जागी गेले. पण तो कोपरा अंकूरला आपलासा वाटेनाच. शिवाय कॉट भिंतीपासून थोड्या अंतरावरच होती. वर आईने बजावलंही - 'भिंतीला टेकून बसू नको हं का अक्कू. भिंतीला डाग पडतील.''

समोरच्या भिंतीवर पण अंकूरने दोन वर्षांपूर्वी छान चित्र काढली होती.ती चित्रं पण त्या दुष्ट रंगवाल्यांनी पुसून टाकली होती. छत, पंखे सगळ्यालाच नवीन रंग लावला होता. सगळं कसं नवं कोरं वाटत होतं. आणि निनाद म्हणत होता, ''मजा आहे बुवा.'' मजा कसली? या वर्षी वाढदिवसाला पण मजा येणार नाहीये मुळीच. रंगीत फुगे, कागदाच्या पट्ट्या असं काय-काय चिकटवून बाबा घर सजवतात. या वर्षी आई असं काहीही चिकटावयाला द्यायची नाही. वाढदिवस असल्यासारखे वाटेलच कसं मग?

त्या दिवशी गादीवाला येऊन अंकूरच्या कॉटवरची जुनी गादी घेऊन जायला लागल्यावर मात्र अंकूरला रडूच यायला लागलं. ''माझी गादी-माझी गादी नाही न्यायची.'' अंकूर गादीवरून उठेनाच. मग बाबांनी चक्क त्याला उचलूनच खाली ठेवलं.

''खड्डे पडलेत ना रे त्या गादीवर? नवीन छान गादी करून आणायची अक्क्या.'' बाबांनी समजावलं. म्हणे 'खड्डे पडलेत' पाडलेत मी ते खास. गोट्या खेळायसाठी. आता नव्या गादीवर गोट्या येतील का खेळायला? नव्याने पाडावे लागतील खड्डे.' पण नवी गादी आली तेव्हा आईने बजावलंच. ''या गादीवर गोट्या नाही हं का खेळायच्या. खाली अंगणात जाऊन खेळ.''

म्हणे अंगणात गोट्या खेळ! खाली येतात का गोट्या खेळायला कुणाला? हा खास समीरकाकांनी शिकवलेला खेळ आहे. डबाभर गोट्यापण समीरकाकांनीच दिल्यात. खाली नेल्या तर हरवून जातील त्या.

जुन्या गालिचाची वळकटी बाबांनी कधी काढून टाकली आणि नवा गालिचा कधी घरात आला कोणास ठाऊक. त्या दिवशी अक्कू खेळून खरी आला तर नवा गालिचा जमिनीवर पहुडलेला, ''आई आपला गालिचा?'' अंकूरने विचारलं. तो सखूमावशीला दिला अक्कू.''

''आँ?'' त्याच्यावर शेती-शेती खेळायचो आम्ही आई.'' जुन्या गालिच्यावर लाल, हिरव्या, निळ्या, पिवळ्या रंगाचे चौकोन होते. बाहेर पाऊस पडत असला की निनाद, सावनी, प्रिती, सुजय सगळे अंकूरच्या घरी जमायचे. प्रत्येकाने गालीचाचा एकेक रंग वाटून घ्यायचा. त्यावर फूटपट्टीने खणायचं. पेरणी करायची, शेती-शेती खेळायला खूप मजा यायची. नव्या गालीच्यावर आधीच फुलापानांची नक्षी आहे. नक्षी इतकी बारीक आहे की रंग वाटून घेऊन शेती करणं कठीणच. शिवाय 'नवा गालिचा सांभाळून वापरायचा हं का अक्कू.'' आईने म्हटलंच. म्हणजे शेती नाहीच.

स्वयंपाकघरात काचेचं जेवणाचं टेबल आणि नव्या गादीवाल्या खुर्च्या आल्या तेव्हा मात्र अंकूरला जाम राग आला. आता काय तर ताट, पेला, कप-बशी, सगळं हळू उचला, हळू ठेवा. गवार-भेंडी अशा भाज्या असल्या तरी टेबलावर राग काढायचा नाही. आई जेवायला वाढेपर्यंत टेबलावर तबला वाजवायला अक्कूला खूप आवडतो. आता या काचेच्या टेबलावर तबला वाजवायला लागलं तर आई पाठीवर बाँगो वाजवायला कमी नाही करणार. शिवाय आधीची खुर्ची कपाटाकडे नेऊन अक्कू त्यावर चढून वरच्या खणातला चॉकलेटचा डबा पाहिजे तेव्हा काढतो. आता या गादीवाल्या खुर्चीवर चढायला कोण देणार त्याला? म्हणजे चॉकलेट खाण्यावर पण बंदीच आली म्हणायची. ''आत्ताच खाल्लं होतंस ना रे मघाशी? आता परत चॉकलेट? जंत होतील ना रे गाढवा, सारखं चॉकलेट खाऊन.'' असं काहीतरी ऐकावं लागणार खास. शिवाय कपाट पण नवीनच आहे. त्यातली चॉकलेटच्या डब्याची जागा पण हेरावी लागणार आता.

घर तर अगदी 'पॉश' का काय म्हणतात तसं झालंय.जमिनीच्या फरशाही बदलून नव्या पांढऱ्याशुभ्र फरशा लावल्यात, त्यावर खुर्ची-स्टुल असं काही घासायचंही नाही. अलगद उचलायचं. अलगद ठेवायचं. बूट कोपऱ्यात काढायचे. घरात माती व्हायला द्यायची नाही. घरात क्रिकेट बंद. अंकूर खाली खेळायला जायला निघाला की त्याला कुठूनसे बॉल-बॅट अलगद काढून दिले जातात. हल्ली अंकूरला घर घरासारखं वाटेनासंच झालंय. इथे टेकू नको, तिथे हात लावू नको. मधूनमधून चाल. अश्शी वाट लागते की सर्कशीत दोरीवरून चालतात तेही याच्यापेक्षा सोप्प असेल असं वाटायला लागतं.

घर नवीन झाल्यावर परवा निनाद आला होता, ''काय सही झालंय रे घर. एकदम चकाचक, मजा आहे बुवा.'' निनाद पुन्हा म्हणाला. म्हणे मजा आहे बुवा! कसली मजा? त्रास आहे नुसता त्रास. अंकूर तर वाट पाहतोय. घर पुन्हा जुनं केव्हा होतंय!

## प्रतिक्रिया

'प्रभुतरुणा'च्या दिवाळी अंकामधील श्री. मुकुंद अजिंक्य यांचा 'ऐंशीच्या उंबरठ्यावर' हा लेख वाचला. त्यात श्री. अजिंक्यांना आलेले काही अप्रिय व कटु अनुभव वाचल्यावर मलाही त्याच तऱ्हेचे काही अनुभव आल्याचे स्मरले.

विसाव्या शतकातील तिसऱ्या दशकात मुंबईमधील सर्व प्राथमिक शाळांतील इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांची मॅट्रिकच्या पद्धतीप्रमाणे एक सामूहिक परीक्षा म्युन्सिपल स्कूल कमिटीतर्फे (अध्यक्ष श्री. बोमन बेहराम) घेतली जात असे. त्या परीक्षेला मी प्रभु सेमिनरीमधून बसलो होतो. निकाल लागताच आमचे वर्गशिक्षक लाडमास्तर (श्री. आत्माराम भाऊ लाड) आमच्या घरी धावत धावत आले व त्यांनी वडिलांना खूषखबर दिली की, आपला बाबू दुसऱ्या नंबराने पास झाला आहे. अर्थात ज्ञातीतून तर मी पहिलाच आलो होतो. काही दिवस गेले. पण कमिटीतर्फे सत्कार किंवा एखादे पुस्तक बक्षीस मिळाल्याचे आठवत नाही.

१९३६च्या मॅट्रिक परीक्षेला बसलेल्या एकूण २३,८८४ मुलांमधून १४व्या व विल्सन हायस्कूलमधून पहिल्या नंबराने मी पास झालो. पण त्याचीही शाळेतर्फे नोंद घेतली गेली नाही. त्याचे कारण १९३५ मध्ये शाळेतील एका खाष्ट शिक्षकाच्या दुराग्रहामुळे या परीक्षेला बसू देण्याचे मला नाकारले होते. (त्याच्या) दुर्दैवाने मी शाळेची 'लाज काढली' त्याचा हा परिणाम.

विल्सन हायस्कूलमधून विल्सन कॉलेजमध्ये पुढील शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांमधून पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्याला एक घसघशीत रोख बक्षीस दिले जात असे. ते देखील मला नाकारले गेले. कारण तेच दुराग्रही गुरुजी!

विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना मी वडिलांकडे एलमेंट्री ग्रेड ड्राईंग परीक्षेला बसण्याची परवानगी मागितली. पण तसे केल्यास माझे शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल म्हणून त्यांनी परवानगी नाकारली. पुढे पुणे इंजिनियरिंग कॉलेजमध्ये १९३८-४१ दरम्यान झालेल्या सर्व वार्षिक परीक्षांमध्ये मला ड्राईंग या विषयात सर्वोच्च गुण मिळाले. इतकेच नव्हे; तर १९४१ मध्ये झालेल्या बी.ई. फायनल परीक्षेत ड्राईंग आणि डिझायनिंग या विषयात सर्वोच्च गुण मिळाल्याने Naigamwala Prize हे सर्वोच्च सन्मानाचे बक्षीस मिळाले.

हा सर्व नियतीचा कोणता खेळ म्हणावा?

**-गोविंदराव भगवंतराव आगासकर**

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

## Heroes

**-Aishwarya Narendra Dhairyawan**

I am sure all of you there are thinking about the film actors, but you are mistaken. I am talking about the real life heroes and not the reel life heroes. The real life heroes according to me are the men from the army, navy, the air force and the police force. These jawans they sacrifice their lives for our security whereas the actors with their acting skills earn money for themselves.

Have we ever thought why is there so much of rush near Mr. Amitabh Bacchan's bungalow? What is his contribution to our country? Why is the country praying for his well being and why are we not praying for the jawans who are on the border fighting for our security? These are the questions I keep asking myself but I get no answers.

We keep blaming the police for their inefficiency but we don't realize that for the job which they do they are paid peanuts. They have difficulties in making their ends meet with the kind of money they get. We always curse them for being corrupt. Every human being needs money so aren't they humans don't they need money for their children's future? By saying this I am not trying to justify them but instead of cursing them why aren't we cursing the politicians who make the system corrupt? We the countrymen in spite of knowing the truth are electing the unwanted leaders. Isn't it a shame and disgrace to our country? The politicians are the real culprits who should be taken to task by all of us. Once the system from the higher end is cleaned up automatically all the illegal things would come to an end.

Also I really feel bad when I see the undeserving people like singers, cricketers and actors getting national awards. Are they really worth it? I definitely feel that these awards are deserved by the jawans who without even thinking once about themselves and their families sacrifice their lives for us.

Nowadays it has become a new trend that our film actors and actresses are entering into politics. Any Tom Dick and Harry comes and rules our country. The great leaders who had helped us to get independence, their heart must be bleeding to see the state of our country. The political elite believe in interest-oriented rather than nation-oriented programmes and policies. We have tolerated such corrupt politicians for so long. The time has now come to destroy it from its roots. And I sincerely pray to god that the military should rule our country. I feel that if our armed forces are encouraged and given rewards and incentives they would be motivated to serve our country more efficiently. After all they are the real heroes of our country and I salute them and pay my homage to the ones who have sacrificed there lives for the well being and security of our country.

## Ideal Date…

**-Raunaq Sameer Vijayakar**

> Prabhu Tarun regrets not printing Raunaq's article in the Ideal Date section in the Diwali issue due to oversight.

What do women want?….no really, what *do* they want? …..Lets not get into what they *really* want, *that's* still a contest winning question! (Psst…Answer is, No One Knows yet)

Moving onto what women consider as Ideal Dates, very predictable one may feel, but women are very adventurous & sometimes depend heavily on fantasy.

Let me illustrate a few examples: typical ideal dates for women!

Good movie, fantastic dinner, guy drops her home in his fancy car (obviously a few blocks away from home)

Amazing time on top of the mountain, watching airplanes above, overlooking city lights below and twinkling stars, just hanging with the person you really love….

Getting high with the smell of the ocean and the taste of champagne, later making your way into the guy's jacket, leaving the poor guy to freeze!

So you see, women *are* very adventurous & *do* depend heavily on fantasy than consideration, however, you might have also noticed, they are freakishly expensive to entertain!

All these things I illustrated above don't come free or rather cheap you know….its you're hard earned money (millionaires, stay out of this, please)

As they say in Hindi- 'Ladki and Kadki are sides of the same coin'

What happened to the traditional dates like walking her through your favorite street, holding hands, talking or not talking…!

We don't have that culture anymore; the guy *needs* to have a fancy bike or a car to show her around. That's not my concern, I do that too….! It's like we're practically ruled by women. They want to have equal say, and also have reserved seats in public transportation! By equal say, I mean an ''ultimatum''…!

That goes to show how far guys would go, to please their respective & prospective women. No offense guys, but that's the way we are.....

It's a race to acquire the most desirable one before someone else does!

I've spent many unproductive hours on dates to realize that it all comes down to nothing but making your girl feel special, trusty & desired …… This is what I call the STD metric!

By Special I mean- Telling her she's hot although she's slightly overweight, overlooking her hideous sense of humor stating everyone is unique, and so on.

By Trusty I mean- Creating enough mutual trust so that you can smile at the girl sitting at the next table but still make a conversation with your woman, w/o her finding out!

And by Desired I mean- Promising you'll call her tomorrow, first thing in the morning…!!

A point comes when you have dated the same girl for so long that you end up calling it ''just another date'', although, there are many similarities…

Now I'm comparing your first ideal date with just another date, situations are constant, but reactions change…

The awkward silence on a first ideal date is cherished under the pretext, we have communication without exchange of words, he/she is soo understanding..

A few dates later, OMG, get a life; it's so dull, I was better off playing video-games at home. Communication turns to sarcasm!

First dates are so conversation packed that you forget you haven't yet placed an order, you're so engrossed with her talks, watching her lips move up n down in slow-mo…

A few dates later, I'm still looking at her lips but this time I'm thinking, can we please eat, I've had a real long day at work, I'm damn hungry!

Paying the bill has never been an issue with our social structure, since these are unwritten rules - 'thy who can grow beard, pays the bill…'

A few dates later, you're wondering, why has she just ordered a garden salad and has her eyes on my food? We're splitting it anyway, rite?

To be fair to my dates, at some point of time they all have!

The other day, I was on a date with this really attractive girl. It was more like an eating competition than a date. She only stopped eating to breathe & to place the next order. I had to cut short that date with immediate effect. Now comes the worst part….

She used to volunteer with an NGO to stop animal slaughter but popped chicken pieces like we pop grapes. It gets better….

She was a student of Economics and tortured me with ideas of Recession Management but refused to split the restaurant bill……ironic?

On my way back home, I stumbled over a guy on his cell phone trying to convince who I thought was his girlfriend, pleading and weeping trying to explain why he forgot her birthday. I pretended to tie my shoelace, grabbing an opportunity to eavesdrop on that interesting conversation. In fact, I was curious to know the excuse he comes up with or maybe the truth! Turns out he said the truth that he absolutely forgot about it, and was dumped that very instance!

That makes me realize the uncertainty of any relationship. Which made me think of that dejected guy's ideal date, and where he ended up….!

This unraveled my thought process on my ideal date. I thought, how about an ideal date that is cost-efficient, eco-friendly & still gives me the opportunity to find a suitable partner for life or just the time being…J This new funda enables you to date far more with limited resources, thus increasing your likelihood of a perfect HIT (Probability Law)

After all, we want to make it ideal so that we end up liking each other over a fun filled conversation, right? I can have a conversation over slightly burnt home cooked food too!

So as much as I would hate deep-frying in my own kitchen, the bubbling oil, fear of burning myself alive, the clean up part, I think this would be an Ideal Date for me!

❑

# Noble Mission

-Komal Uday Kirtikar

Komal has earned her MBA degree from Harvard Business School and is currently interning with a non-profit organization Embrace in India. She shares her experience with our readers.

The sun-beaten concrete floors scalded the soles of my normally overprotected American feet as we stood in a rural Chhattisgarhi home. My team and I had come to the remote village of Bahmni to research how healthcare is delivered in the most rural areas of India. On that particularly hot afternoon, we city folk were missing the luxury of a simple electric fan. However, lying on a cot next to us in the same scorching environment was a one month old infant, Amrit, donning a woolen cap and swaddled in endless layers of blankets and sari cloth.

Amrit was born at 1.7kg, qualifying him as a low birth weight infant (less than 2.5kg at birth). Around 30% of India's newborns are low birth weight and have insufficient fat to keep the core warm enough for critical organ development. Some actually do not survive and those who do are more prone to disease and other health complications. India actually has 40% of the world's low birth weight infants and 30% of the world's neonatal deaths.

Embrace, a low-cost medical device organization based out of Bangalore, is trying to tackle this problem. The team's solution, very simplistically, is a wax-like substance that melts at 37°C and retains that temperature for at least 4-6 hours. A plastic pouch containing this material can be heated and inserted into an infant sleeping bag to create a microclimate that maintains 37°C for the baby. (For more information, please visit www.embraceglobal.org). The Embrace team, all graduates from various Stanford University programs, has decided to design, manufacture and distribute these infant warmers in India.

I had the good fortune of interning with Embrace for the last three months, conducting market research in parts of India that I had never would have otherwise visited. It was actually during my visit to the breathtaking Kumaon district in Uttarakhand that I truly built empathy for the hypothermic infants who Embrace is trying to help. Unprepared for the chilling weather of the Himalayan foothills, I slept in five layers of clothes, a locally knit woolen cap, and what felt like a 20kg *rajai,* but STILL shivered. After musing how I resembled an adult version of the Chhattisgari infant, Amrit, I cringed to think how a low birth weight infant must actually feel in such icy weather…and how she must struggle to survive. It was this thought that motivated me to shed the protection of the *rajai* in the frosty Kumaoni mornings, and continue pursuing Embrace's noble mission in rural India. ❑

# पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा दांडिया कार्यक्रम शनिवार, दि. १० ऑक्टो. ०९ रोजी खार येथील पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या पटांगणात मोठ्या उत्साहाने साजरा झाला.

समाजाच्या अध्यक्ष सौ. वृंदा जयकर ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या डॉ. सौ. अश्विनी देसाई वाघ. परीक्षक सौ. अवनी देसाई व सौ. गोपी मजुमदार या भगिनींना सन्मानित करण्यात आले.

सौ. प्रमिला तळपदे यांनी ज्ञातीय भगिनींना घेऊन हिंदी सिनेसंगीतावर आधारीत दांडिया रासाचे आयोजन केले होते. सौ. रुपा शाह यांनी नृत्यदिग्दर्शन केले. आबालवृद्धांनी दांडिया कार्यक्रमात सहभागी होऊन मनसोक्त आनंद घेतला.

प्रमुख पाहुण्या सौ. अश्विनी देसाई वाघ यांनी आपल्या भाषणात महिला समाजाची प्रशंसा केली. त्याचबरोबर समाजाला रु. ५०००/- देणगीही जाहीर केली. यावेळी भाग्यक्रमांक मान्यवरांच्या हस्ते काढण्यात आले. श्री. सुनील जयकर यांच्यातर्फे बक्षीस व श्रीमती लीला राणे यांच्यातर्फे सिनियर सिटीझनकरीता खास बक्षिस देण्यात आले.ही बक्षिसे पुढीलप्रमाणे-

**१) उत्कृष्ट वेशभुषा १० वर्षाखालील**

मुलगा- कु. निशांत अतुल तळपदे

मुलगी-कु. अदिती अमित तळपदे

**२) १० ते ६० वर्षांपर्यंत**

पुरुष-श्री. पराग जयकर

स्त्री- सौ.मयुरा गुंजारव नायक

स्त्री- कु. कश्मीरा राजस अजिंक्य

स्त्री- कु. रिमा सुधीर धुरंधर

**६० वर्षांवरील**

पुरुष- श्री. प्रदीप श्रीकर राणे

स्त्री- सौ. मंगला धैर्यवान

**उत्कृष्ट नृत्य १० वर्षाखालील**

मुलगा-कु.अलंकार भूषण विजयकर

मुलगी- कु. अनुष्का आशीष नवलकर

**१० ते ६० वर्षांपर्यंत**

पुरुष-श्री. दीप नंदकुमार विजयकर

पुरुष-श्री. स्वप्नील सुभाषचंद्र कीर्तिकर

स्त्री- सौ. मयुरा गुंजारव नायक

स्त्री-सौ. अनिता सुनील कोठारे

**६० वर्षांवरील**

पुरुष- श्री. सुभाषचंद्र विश्वासराव कीर्तिकर

पुरुष- श्री. अजित प्रमोद तळपदे

स्त्री-सौ. मधु वसंतराव धुरंधर

स्त्री- सौ. दिपाली नंदकिशोर कोठारे

**शुभक्रमांक**

सौ. किशोरी त्रिलोकेकर, सौ. वर्षा नवलकर, सौ. मनिला राव, सौ. सुरुची प्रधान, कु. शिवानी नवलकर, सौ. भारती विजयकर, सौ. माधवी जयकर, श्रीमती माधुरी नायक, सौ. मंजू वेलकर, कु. अनुष्का नवलकर

**आगामी कार्यक्रम**

रविवार, दि. २७ डिसें.०९ रोजी पाठारे प्रभु महिला समाजाची १ दिवसीय सहल विसावा रिसॉर्ट, मुरबाड येथे नेण्यात येईल. प्रत्येकी शुल्क रु. ५७५/- आकारण्यात येतील. पैसे देण्याची शेवटची तारीख १९ डिसें. ०९. बुकींगप्रमाणे आसन नंबर दिले जातील. दिलेले नाव रद्द केले जाणार नाही. चिटणीसांकडे त्वरीत पैसे भरून नावे द्यावीत.

शनि. दि. ९ जाने. २०१० रोजी सुरेश विठ्ठल हॉल, ठाकुरद्वार येथे दुपारी ४ वा. पुढील स्पर्धा घेण्यात येतील.

**१) कला कौशल्य स्पर्धा-**

**विषय- कार्ड पेपरची ताटाभोवतालची महिरप तयार करणे. वेळ १ तास**

(कलाकृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे व साहित्य ज्याचे त्याने आणावे.)

**२) सामान्य ज्ञान स्पर्धा-**

विषय- दिलेले पर्याय निवडून प्रश्नांची अचूक उत्तरे लिहीणे (वेळ १ तास),

वयोगट- ६ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे, १६ ते २२ वर्षे.

रविवार, दि. १७ जाने. २०१० रोजी पाठारे प्रभु महिला समाजातर्फे **'आनंद मेळावा'** पाठारे प्रभु को.ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर १२वा रस्ता, खार (प.) येथे आयोजित केला जाईल. वेळ ३ ते ९. स्टॉल्स् घेऊ इच्छिणाऱ्यांनी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

समाजसेवेच्या पदकासाठी ज्ञाती अथवा ज्ञातीबाहेर काम करणाऱ्या भगिनींनी आपला बायोडाटा चिटणीसांकडे त्वरीत पाठवावा.

सौ. नीता सेंजित - ९८२०१६६६२८/२८९८५८४८,

सौ. अक्षदा तळपदे २२०९५९००/९८२०८९४७७०

सौ. प्रतिभा विजयकर २४३७२९९४/९२२३२३६३२१

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे शुक्रवार. दि. २ ऑक्टो. ०९ रोजी रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व पाकसिद्धी स्पर्धा घेण्यात आल्या.

**१) रांगोळी स्पर्धा (महिलांसाठी)**

**विषय- ताज्या फुलांची रांगोळी**

प्र.क्र. श्रीमती सुरुपा राणे देवरुखकर

द्वि.क्र.-सौ. पल्लवी परेश कोठारे

तृ.क्र.-श्रीमती हेमा रामचंद्र जयकर

**२) पाकसिद्धी स्पर्धा (महिलांसाठी)**

**विषय- तळलेल्या करंज्या**

(सुक्या खोबऱ्याच्या पुरणाच्या) घरून करून आणणे.

प्र.क्र.- सौ. शीतल सुखेन्दु राव

द्वि.क्र.(विभागून) - सौ. मृणाल राधाकृष्ण तळपदे, श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर,

तृ. क्र.-सौ. स्वप्ना विनीत जयकर

**३) चित्रकला स्पर्धा (मुलींसाठी)**

**अ-गट ( वय ५ ते ८)**

**विषय- आयत्या वेळी दिलेले चित्र क्रेयॉन कलरने रंगविणे.**

प्र. क्र.-कु.अलिषा राहुल नवलकर

द्वि.क्र.-कु. संजना अंजन कोठारे

**४) चित्रकला स्पर्धा (मुलींसाठी)**

**ब-गट (वय ९ ते १५)**

ह्या गटात एकच स्पर्धक असल्यामुळे समाजातर्फे बक्षीस दिले जाईल. कु. रुची सौमिल कोठारे

समाजाच्या गरजू भगिनींना लाडू व लुगडी वाटण्यात आली तसेच प्रभादेवी चॅरिटेबल ट्रस्टकडून आलेल्या ओटीच्या साड्या व खण वाटण्यात आले. सौ. लीना वाझकर, सौ. योगिनी धैर्यवान व सौ.योगिता नवलकर या भगिनींकडून दिवाळी-निमित्त सुकडीकरीता साहित्य वाटण्यात आले. सौ. वर्तिका कीर्तिकर व सौ. माधुरी कीर्तिकर-कडून लक्स साबू व व्हील साबू वाटण्यात आले. तसेच सौ. मिनल व श्री. हेमंत मोरेश्वर जयकरकडून त्यांच्या मातोश्री कै. श्रीमती रोझा मोरेश्वर खंडेराव जयकर स्मरणार्थ प्रत्येकी ५० रु. वाटण्यात आले.

रांगोळी स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे परीक्षण सौ. सीमा सुधीर धैर्यवान व सौ. प्रमिला मधुकर तळपदे यांनी केले. उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

## Report on Swar Samwad

A musical entertainment programme 'Swar Samwad' was organised on 17th October 2009 by Bhavan's college cultural group 'Snehankit'. Smt. Indumati Lele and Shri. Vitthal Umap graced the occasion with their eminent presence. Swar Samwad would not be possible without timely management and organization by Raj Vijayakar along with the other members of the group. Congratulations to Raj!!!

## परीक्षेतील सुयश

**एमबीए**

श्री. नितीन चित्रसेन कोठारे

**एमएमएस**

श्री. अन्वय रंजन मुकुंद देसाई

## चुकीची दुरुस्ती

गतांकात भाऊबीज यादीत नीता दीपक विजयकर ५००/- असे वाचावे.

कु. निवेदिता नीलेश नायक ही आर्किटेक्चरच्या तिसऱ्या वर्षात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली असे वाचावे.

## प्रभुतरुणास देणग्या

❀ सौ. देवश्री आणि श्री. निषाद बन्सी धुरंधर यांजकडून त्यांच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. ५००१/-

❀ सौ. प्रतिभा रवींद्र जयकर यांजकजून त्यांचा नातू हर्ष संदेश देसाई यांनी एस्.एस.सी. परीक्षेत उज्ज्वल यश मिळविल्याबद्दल आणि त्यांचे पती श्री. रवींद्र वसंतराव जयकर यांची ४-११-०९ रोजी पंच्याहत्तरी साजरी झाल्याप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❀ श्री. नितीन वसंतराव देसाई यांजकडून त्यांचे वडील श्री. वसंतराव वामनराव देसाई यांच्या जन्मशताब्दी-स्मृत्यर्थ रु. ५००/-

❀ सौ. नीलिमा सुजन राणे यांजकडून 'ऑन लाईन'ची वर्गणी रु. ५००/-

❀ सौ. निकेता प्रशांत राणे यांच्याकडून त्यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त (६ डिसेंबर ०९) रु. २५०/-

❀ श्री. मधुकर शांताराम मानकर यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज भेट रु.१००/-

❀ श्री. विठोबा गजानन नायककडून त्यांच्या भाच्याचा मुलगा श्री. आधार संदीप कोठारे हा एमबीए झाल्याबद्दल रु. ५१/

## अभिनंदन

❀ श्री. आशीष प्रमोद नवलकर यांची गल्फ ऑइल कार्पो. लि. या कंपनीत 'सप्लाय चेन'मध्ये सिनियर मॅनेजर म्हणून १ ऑक्टो.०९ पासून बढती झाली. अभिनंदन

❀ चॅरिटीजचे विश्वस्त श्री. सुनील सत्येंद्रनाथ कोठारे यांना राष्ट्रभाषा प्रचार समिती, भोपाळ या संस्थेतर्फे हिंदी भाषा सेवेबद्दल पुरस्कार प्राप्त झाला. हिंदुस्तान प्रचार सभा, मुंबई येथे ते मानद सचिव म्हणून कार्यरत आहेत. अभिनंदन.

❀ श्रीमती उज्ज्वला गोविंदराव आगासकर (बी.आर्क.) यांनी नाशिक येथून न्यायव्यवस्थेवर आधारीत 'जस्टिस अबॉव्ह ऑल' नावाचे मासिक धडाडीने सुरू केले आहे. अभिनंदन. प्रकाशित झालेला पहिला अंक वाचनीय आणि विचारांना खाद्य पुरविणारा असाच आहे. अनेक मान्यवरांच्या शुभेच्छा-सह नटलेला हा अंक आश्वासक आहे.त्यांना पुढील अंकासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

❀ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'अजबुली घंटुली' या बालकादंबरीला बाल-कुमार साहित्यसभा (कोल्हापूर) यांचा २००८चा उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार मिळाला. अभिनंदन.

❀ आमचे व्यंगचित्रकार श्री. प्रदीप कोठारे यांचे दहशतवादावरील व्यंगचित्र 'नवाकाळ'मध्ये प्रसिद्ध झाले अभिनंदन.

❀ महाराष्ट्र नियंत्रण प्रदूषण मंडळ आणि दै. लोकसत्ता यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गाथा ज्ञानाची' या स्पर्धेत कु. प्रांजली अनिल व्यवहारकर हिला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. अभिनंदन.

❀ ४ नोव्हें. रोजी कै. वसंतराव वामनराव देसाई यांची जन्मस्मृती



त्यांच्या कुटुंबीयांनी जागविली. निमित्त होते त्याच्या जन्मशताब्दीचे. ॲड. वसंतराव नामवंत वकील होतेच; पण आपल्या वकिलीचा त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत योगदान म्हणून वापर केला. ते फर्डे वक्ते होते. मराठी, इंग्रजी भाषेतील वक्तृत्व म्हणजे श्रोत्यांना मेजवानीच असे. त्यात नर्म विनोदाची पेरणीही ते करीत. पाठारे प्रभू रिलीफ फंडात त्यांचे योगदान होतेच. पाठारे प्रभू चॅरिटीजमध्येही ते अनेक वर्ष कार्यरत होते. ते मृत्यू पावले तेव्हा चॅरिटीजचे अध्यक्ष होते. आपली अध्यक्षीय कारकीर्द त्यांनी वक्तृत्व, कार्य यामुळे गाजविली. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत कार्यवाह म्हणून काम करणाऱ्या आणि आज विश्वस्त असलेल्या श्री. वीरपाल राणे यांनी ४ नोव्हेंबरला त्यांच्या घरी जाऊन प्रतिमेस हार घालून कृतज्ञता व्यक्त केली हे उचितच. वसंतराव हे सेवाभावी होते. संयुक्त महाराष्ट्र समितीत काम करताना त्यांनी विनामूल्य असे सहकार्य केले. बार कौन्सिल ऑफ इंडियाने याची विशेष दखल घेतली होती. अवघ्या ५१ वर्षांच्या आपल्या आयुष्यात त्यांनी १०० नंबरी कार्य केले. त्यांच्या जन्मशताब्दी-निमित्त त्यांना आमचे कृतज्ञ वंदन. ❑

// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकास्व कॅटरर्स**

**शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!**

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत.*
*पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय*
*सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*
*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१६-१०-०९ सौ. प्राजंली आणि पवन प्रदीप कीर्तिकर, पुत्र, खार

### आत्याबाई नाव बोला

कुमार विहान श्रीनल शरद कोठारे

### नारळसाखर दिला

१९-१०-०९ श्री. स्वप्नील अरविंद व्यवहारकर, कु. कश्मीरा राजस अजिंक्य

### नांदा सौख्यभरे

१-११-०९ श्री. अभिजीत राजेंद्र विनायक नवलकर कु. प्रणाली किरण श्रीकृष्ण कोठारे
२२-११-०९ श्री. सौरभ संदीप नायक कु. हेतल जितेंद्रकुमार गोहील (आंतरज्ञातीय)
२९-११-०९ श्री. लोकेश सुधीर भोलानाथ कोठारे कु. मिथिला अजित कृष्णकांत नवलकर
२९-११-०९ श्री. निषाद बन्सीधर धुरंधर कु. देवश्री प्रदीप विजयकर
३-१२-०९ श्री. अतुल काशीनाथ जगताप कु. धारिणी कुमारसेन वासुदेव जयकर (आंतरज्ञातीय)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १६-१०-०९ | श्रीमती सुमित्रा दत्तात्रय कोठारे, | वय ८८ वर्षे | ठाकूरद्वार |
| २९-१०-०९ | श्री. रमेश गणपतराव प्रधान, | वय ७४ वर्षे | अंधेरी |
| १-११-०९ | सौ. चंद्रप्रभा दत्तगुरू धैर्यवान, | वय ७७ वर्षे | पुणे |
| ३-११-०९ | श्री. उल्हास शंकरराव आगासकर | वय ६७ वर्षे | ठाणे |
| ५-११-०९ | श्री. सुबोध केशवराव कोठारे, | वय ७४ वर्षे | मीरारोड |
| ५-११-०९ | श्रीमती मीनल नरेंद्र गोरक्षकर, | वय ७५ वर्षे | माहीम |
| २८-११-०९ | सौ. शुभांगना(चांदणी) सुनील धुरंधर, | वय ६३ वर्षे | अंधेरी (पूर्व) |

## हौशी कला मंदिर

पाठारे प्रभु हे हौशी आहेत. त्यांची 'हौशी कला मंदिर' ही संस्था. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'रंगशारदा' येथे दिवाळी संमलेन झाले. 'कबड्डी' नाटक, लकी ड्रॉ, प्रमुख पाहुणे श्री. उदय शंकर झावबा यांचे अल्पाक्षरी आनंदमयी भाषण आणि प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचे विनोदाची शिंपण असणारे भाषण- यांनी हे संमेलन रंगले. संस्थेने दरवर्षीप्रमाणे रात्री उशीरा स्पेशल बसची 'यातायात' ठेवून रसिकांची यातायात वाचवली!

याप्रसंगी देणग्या आल्या; त्यांची यादी- श्री. उदय शंकर झावबा २१०००/-, श्री. सुजीत कीर्तिकर ८०००/-, पी. के. नायक ५००१/-, आर्किटेक्ट बॉबी विजयकर ५००१/-, दुलारी जयकर ५०००/-, सुभाष प्रधान स्मृतिप्रीत्यर्थ हेमा व मीना प्रधानकडून ५०००/-, नेत्रा अजित विजयकर ३५००/-, सुहासिनी कीर्तिकर २००१/-, सरोज जी. प्रधान १७५१/-, श्री. पांडुरंग कोठारे १५००/-, डॉ. सुनील अरविंद राणे १००१/-, लीना वाय्. विजयकर १००१/-, पद्मा विजयकर १०००/-, जोगेश्वरी रिसॉर्ट १०००/- आणि बक्षिस.

### आगामी

२४ जानेवारी रोजी सहावी टेनिस बॉल क्रिकेट मॅच आयोजित केली आहे. ही मॅच एअर इंडिया, सांताक्रूझ येथे होईल. इच्छुकांनी श्री. प्रकाश नायक (२६४६४७८४) किंवा श्री. रोहिल जयकर यांच्याशी संपर्क साधावा. ❑

*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.
Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.
Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees : PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA" Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906 Mobile : 9821447675
Booking Mobile : 09823884094/09422543614